
# विद्यापीठ परीक्षांबाबत चार दिवसांत निर्णय

मुंबई : राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा कशा घ्याव्यात यासंदर्भात समिती नेमली असली तरी केंद्र सरकारने युजीसीच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली आहे. त्या संदर्भात युजीसी मार्गदर्शकत्वे आल्यानंतर समितीच्या येत्या दोन दिवसात होणाऱ्या बैठकीत निर्णय होणार असल्याचे समजते.

# प्रशासनाला साथ द्या...



पोलीस, डॉक्टर व
प्रशासनाला
सहकार्य करूया;
कोरोनाला
पळवून लावूया;
स्वतःची व कुटुंबाची
काळजी घ्या,
घरीच रहा,
सुरक्षित रहा...

## डॉ. विलास दत्तू नांदवडेकर

**आपण सुरक्षित...**
**तर देश सुरक्षित...**

पुढारी

संक्षिप्त




**कोल्हापूर : विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एस. एस. महाजन.**

# विद्यापीठात आंबेडकर जयंती साजरी

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. सोशल डिस्टन्सिगचे पूर्णत: पालन करीत जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, गजानन पळसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. डी. राऊत उपस्थित होते.

# ‘सीमा भागातील तालुक्यांनी सतर्क राहावे’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

बेळगाव जिल्ह्यात करोनाचा प्रादुर्भाव वाढला असून सीमा भागातील गावांना संसर्ग होऊ नये, यासाठी चंदगड, गडहिंग्लज, कागल, हातकणंगले आणि शिरोळ तालुक्यातील गावांनी सतर्क रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी गुरुवारी केले.

ते म्हणाले, सीमा भागातून होणाऱ्या वाहतुकीवर नियंत्रण आणावे. पोलिससह सर्वच यंत्रणांनी अधिक सतर्क रहावे. शिवाजी विद्यापीठ आणि संजय घोडावत विद्यापीठात प्रत्येकी ५०० खाटांचे कोव्हिड केअर आणि कोव्हिड हेल्थ रुग्णालय सुरु करण्यात येणार आहे. येथे वैद्यकीय उपकरणासह विविध मदतीची गरज आहे. यासाठी दानशुरांनी पुढे येवून https://kolhapuriwarriors.com या संकेतस्थळावर आपली नोंदणी करावी. या रुग्णालयासाठी वैद्यकीय व्यावसायिक, पॅरामेडिकल, वॉर्डबॉय, परिचारिका, फार्मसिस्ट, आरोग्य सेवक, वैद्यकीय उपकरणे, दवाखान्यात लागणारे इतर साहित्य, संगणक, तांत्रिक सेवांची आवश्यकता आहे.

# विद्यापीठ 'डीओटी' वसतिगृहातील साहित्य पॅकिंगचे काम पूर्ण

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठातील 'डीओटी'च्या विद्यार्थी- विद्यार्थिनी वसतिगृहातील साहित्य पॅकिंगचे काम पूर्ण झाले असून आयसीयू, आयसोलेशन रुग्णालयाबाबतची पुढील कार्यवाही सुरू झाली आहे. कोरोना व संशयित रुग्णांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग (डीओटी) विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृह ताब्यात घेण्यात आली आहेत. विद्यार्थी- विद्यार्थिनी वसतिगृहाच्या २५० खोल्यांमधील साहित्य व्हिडीओ शूटिंग करून साहित्य हलविण्यात आले आहे. वसतिगृहाची स्वच्छताही पूर्ण होत आली आहे. जिल्हा प्रशासनाकडून साहित्य उपलब्ध करून देण्यास सुरुवात झाल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.